■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९७ ■ सोमवार दि.१५ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ५
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 297 ■ Tuesday Dt.15 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 5

# नऊ तास पोलिस ठाण्यात ठाण मांडलेल्या महिलेला अचानक काय झालं? गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांच्यावरचा गुन्हा अचानक मागे का?

## गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर महिलेसोबत छेडछाडीचा आरोप; शिक्षण विभागात खळबळ?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## बेडसकर यांना या प्रकरणातून वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेपाची चर्चा; गुन्हा मागे घेण्यामागे दबावाचा काटा?

# गटशिक्षणाधिकारी बेडसकर प्रकरणात आर्थिक तडजोडीचा आरोप; गुन्हा मागे घेण्यासाठी दबावाचा खेळ?

## एसपींना महिलेकडून भेटीनंतरही बेडसकर प्रकरणात गुन्हा दाखल नाही; पोलिस प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण?

## या प्रकरणात पोलिसांकडून गुन्हा नोंदवण्यास जाणीवपूर्वक विलंब; गुन्हा दाखल होऊ नये म्हणून पोलीसही दबावात काम करत होते का?

बीड । प्रतिनिधी

केजचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका महिलेसोबत छेडछाड केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील अधिकार्यांच्या वर्तणुकीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिला सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे शिक्षण विभागातील कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचारात वादग्रस्त म्हणून ठरले आहे. यातच आता त्यांच्यावर एका महिलेसोबत गैरवर्तन केल्याचा धक्कादायक आरोप सदरील महिलेने केला आहे. या प्रकारामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे.




याबाबत सविस्तर माहिती अशी की, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी तीन महिन्यापूर्वी आपल्या सोबत छेडछाड केल्याचे सदरील महिलेने म्हटले आहे. अनेक वेळा पोलिसात तक्रार देण्याचा प्रयत्न केला मात्र नातेवाईक व जवळील काही लोकांनी पैसे घेऊन शांत बस असाच सल्ला दिल्यामुळे तक्रार देण्यासाठी विलंब झाला असल्याचे सदरील महिलेने सांगितले. सदरील महिला काल दि.१४ जुलै रोजी मोठ्या धाडसाने तक्रार देण्यासाठी केस पोलीस स्टेशनला गेली असता, तक्रार मागे घेण्यासाठी ईश्वर सोनवणे नावाचा व्यक्ती त्या महिलेवर तिथे आत मध्ये जाऊन दबावाण्याचा प्रयत्न करत होता. सदरील प्रकार सुनील हिरवेनी पोलीस प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर सोनवणे नावाच्या व्यक्तीला तिथून बाहेर काढण्यात आले होते. या महिलेवर अन्याय झाला असून तातडीने तक्रार नोंदवून घेण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तालुका अध्यक्ष सुनील हिरवे ठामपणे महिलेच्या बाजूने उभे होते. या सर्व प्रकरणांमध्ये काहीतरी कारण देऊन गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून टाळाटाळ करण्यात येत होते. सदरील गुन्हा मागे घेण्यासाठी आणि गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी या प्रकरणांतून वाचवण्यासाठी तसेच कुठेतरी तडजोड व्हावी यासाठी केज शहरातील अनेक मातब्बर मंडळी जिवानिशी प्रयत्न करत होते. आरोपीच्या भोवऱ्यात सापडलेल्या लक्ष्मण बेडस्कर या व्यक्तीला वाचवण्यासाठी केज पोलीस



ठाण्यामध्ये सर्व राजकीय व आर्थिक ताकद एकवटली असल्याचे पोलीस प्रशासन व त्यांचे अधिकारी उघड्या डोळ्यांनी सगळं बघत होते. दि.१४ जुलै रोजी दुपारी जवळ जवळ दोन वाजल्यापासून ते रात्री दहा वाजेपर्यंत आपल्यावर अन्याय झाला असून लक्ष्मण बिडसकर या व्यक्तीवर गुन्हा दाखल व्हावा या मतावर ठाम असणारी महिला अचानक आपला निर्णय बदलते व आपण गुन्हा माघारी घेत असल्याचे कबूल करते. यामागचा दबाव आणि कारण काय? असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. सदरील महिला गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशनला गेली त्यावेळी

पान २ वर





### पोलीस निरीक्षक उणवणे साहेब हे वागणं बरं नव्हं?

अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पीडित महिलेची तक्रार त्वरीत नोंदवून घ्यावी, या लोकशाही मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तालुका अध्यक्ष सुनील हिरवे हे सकाळपासून त्या महिलेच्या पाठीमागे ठामपणे उभे होते. त्या महिलेची बाजू पोलिस प्रशासनाने समजून घ्यावी, यासाठी ते प्रयत्न करीत होते. त्या महिलेवर पोलिस ठाण्यात असून देखील दबाव तंत्राचा वापर होत असताना सुनील हिरवे त्यांना परतवून लावत होते, आणि आपले पोलिस प्रशासन नुसती बघ्याची भूमिका घेत होते. नऊ तास आपल्या भूमिकेवर ठाम असणारी महिला त्यानंतर मात्र अचानक आपला निर्णय बदलते, आणि आपण गुन्हा माघारी घेत असल्याचे कबूल करते. या बदलेल्या भूमिकेचे श्रेय नेमके कोणाला जाते, स्वत: सबंधित महिलेला, पोलिस प्रशासनाला, लक्ष्मण बेडस्करला की आणखीन कोणाला हे आता पाहण्यासारखे ठरले आहे.

### पत्रकारांना माहिती देण्यास पोलीस निरीक्षकांचा नकार; उलटसुलट भाषेत संवाद, पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर झालेल्या छेडछाडीच्या आरोपप्रकरणात पोलीस प्रशासनाची भूमिका आधीच संशयाच्या भोवऱ्यात असताना, आता पत्रकारांशी संवाद साधताना पोलीस निरीक्षकांनी टाळाटाळ व उद्धट भाषा वापरल्याची तक्रार समोर आली आहे. प्रकरणाची अधिकृत माहिती घेण्यासाठी पत्रकारांनी संबंधित पोलीस निरीक्षकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी मी तुम्हाला माहिती कशी काय देऊ शकतो? असा उलट प्रश्न करत संवाद थांबवला. पत्रकारांनी चौकशी करण्याचा प्रयत्न केला असतानाही पोलीस निरीक्षकांनी उलटसुलट आणि टाळणारी भाषा वापरल्याने नाराजी व्यक्त होत आहे. यामुळे पोलीस निरीक्षक यांची देखील चौकशी होणे गरजेचे आहे.

### पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसलेली महिला अचानक मागे का सरकली?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर छेडछाडीचा गुन्हा दाखल करण्यासाठी तब्बल नऊ तास पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसलेली महिला अचानक मागे का सरकली, याबाबत सध्या चर्चा आणि शंका अधिकच गडद होत आहेत. संबंधित महिला लक्ष्मण बेडसकर यांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप करत तक्रार नोंदवण्यासाठी पोलिस ठाण्यात थेट हजेरी लावली होती. गुन्हा दाखल करण्याची मागणीही ठामपणे मांडली. मात्र, अचानक मध्यरात्री तिने तक्रार मागे घेतली आहे. या नाट्यमय बदलामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या महिलेवर दबाव टाकण्यात आला का? राजकीय किंवा प्रशासकीय हस्तक्षेप झाला का? तिचा मनोबल खच्ची केलं गेलं का? या सर्व शक्यतांवर आता चर्चा रंगत आहे. यामागचा सत्य बाहेर यावे यासाठी सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. जर महिला खोटं बोलत असेल, तर कायदेशीर कारवाई करा. पण जर ती बरोबर असेल, आणि तिला दबावाखाली माघार घ्यावी लागली असेल, तर दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे,अशी संतप्त भूमिका अनेकांनी मांडली आहे. या प्रकरणामुळे शिक्षण विभागात आणि जिल्ह्यातील सामाजिक वर्तुळात ही घटना सध्या चर्चेचा कळीचा विषय बनली आहे.

### गुन्हा मागे घेण्यासाठी मोठा दबाव आणि आर्थिक तडजोड; महिला सुरक्षिततेचा खेळखंडोबा करू नका?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर महिलेने केलेल्या छेडछाडीच्या आरोपानंतर अचानक गुन्हा मागे घेतल्यामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, आता या मागे आर्थिक तडजोड झाल्याचे बोलले जात आहे. संबंधित महिला तब्बल नऊ तास पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसलेली होती. तिने सविस्तर तक्रार दिली मात्र अचानक तिने आपला गुन्हा मागे घेतल्यामुळे या नाट्यमय घडामोडीमागे मोठा दबाव आणि आर्थिक तडजोड झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आर्थिक तडतड करून तिला गप्प बसवण्यात आलं. यात काही स्थानिक मध्यस्थांचीही भूमिका असल्याची चर्चा आहे. महिला सुरक्षिततेचा खेळखंडोबा करू देणार नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी सखोल चौकशी आणि न्यायिक तपासाची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाचा पुढचा तपशील काय समोर येतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे, कारण शिक्षकवर्ग, पालक, आणि समाजमन यामध्ये या घटनेमुळे अस्वस्थता वाढली आहे.


### राजकीय दबाव आणून गुन्हा मागे घेतला गेला, जिल्ह्यात जोरदार चर्चा?

महिलेने गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर केलेल्या छेडछाडीच्या आरोपानंतर अचानक तक्रार मागे घेतल्याने संपूर्ण प्रकरणाला कलाटणी मिळाली आहे. आता या प्रकरणात राजकीय दबाव आणून गुन्हा मागे घेतला गेला, अशी जोरदार चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. संबंधित महिला तब्बल नऊ तास पोलिस ठाण्यात बसून होती. गुन्हा दाखल करण्याचा तिचा निश्चय ठाम होता. मात्र, मध्यरात्रीच्या सुमारास तिने अचानक तक्रार मागे घेतली आणि यामागे वरून दबाव आला असल्याचे काही सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. स्थानिक राजकीय नेते, काही सत्ताधारी मंडळी आणि प्रकरणात मध्यस्थी करत असल्याचाही चर्चा ऐकायला मिळत आहे. बेडसकर यांना वाचवण्यासाठी प्रशासकीय आणि राजकीय यंत्रणा एकवटली गेल्याची चर्चा आहे. या प्रकरणात दबाव, तडजोड आणि राजकीय हस्तक्षेपाची साखळी उजेडात येत असल्याने समाजात प्रचंड संतापाची भावना आहे.

# गेवराई शहरात क्लासेस व शाळेजवळ रोडरोमिओंचा धुमाकूळ

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील शाळा-महाविद्यालयांबाहेर व खाजगी क्लासेसच्या अवतीभवती रोडरोमिओंनी धुमाकूळ घातला असून, यातून अनेक विद्यार्थिनींची छेड काढण्याचे प्रकार वाढले आहेत. र.भ.अट्टल महाविद्यालय, न्युहास्कुल शाळा, जिल्हा परिषद मुलींची कन्या शाळा परिसरातील रोडरोमिओंचा मोठा त्रास असून, याबाबत पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा पालक वर्गामधून व्यक्त केली जात आहे. विद्यार्थिनींबाबत आत्मसरंक्षणाचे धडे द्यावेत, तसेच योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.



अनेक शाळा-महाविद्यालयांबाहेर व खाजगी क्लासेसच्या अवतीभवती रस्त्यावर जोराजोरात गाड्या उडवून फिरणारे रोडरोमिओ, शाळा, महाविद्यालयांचे गेट, बसस्थानकावर गर्दी करणार्यांमुळे विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. सायलेन्सरला फटाक्याचे आवाज लावून वेगात गाडी पळविल्याने अपघात होण्याच्या घटना घडतात. त्यामुळे रोडरोमिओंना चाप लावण्यासाठी गेवराई शहरात पोलिसांमार्फत विशेष मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शाळा-महाविद्यालयांसमोर व खाजगी क्लासेस जवळ दुचाक्या वेगाने पळवणे, वेगवेगळ्या आवाजात हॉर्न वाजविणे, शाळा, महाविद्यालयांबाहेर विद्यार्थिनींची छेडछाड करणे आदी प्रकारात वाढ होत आहे. याचा नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### पालकांमध्ये नाराजी

रोडरोमिओंमुळे काही पालकांत शैक्षणिक दृष्ट्या भीतीचे वातावरण पसरले आहे. बीड येथील झालेल्या खाजगी क्लासेसच्या घटनेमुळे खळबळ उडाली होती. शॉर्ट झालेले काही मातेफिरू तरुण विद्यार्थिनींना त्रासदायक ठरत आहेत. नित्यनेमाने दररोज नवीन बस स्टॅन्ड ते शाळा महाविद्यालयापर्यंत सकाळी व शाळा सुटल्यानंतर या रोडरोमिओ शिट्ट्या मारत आहेत. विद्यार्थिनींच्या अवतीभवती मोटार सायकल फिरून परत परत त्याच रस्त्याने चकरा मारत आहे मात्र, याकडे पोलिसांकडून कुठल्याही ठोस उपाययोजना न झाल्याने पालकांत नाराजी आहे. सदरील पोलीस प्रशासनाने दामिनी पथकाची स्थापना करून त्रास देणाऱ्यावर कारवाई करावी.




# धारूर येथील आरुष अबॅकस क्लासेस चे नॅशनल कॉम्पिटिशन मध्ये नेत्रदीपक यश

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरासह तालुक्यात व तालुक्याबाहेर शैक्षणिक क्षेत्रात जोमाने कार्य करत असणाऱ्या धारूर येथील आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस ने १३ जुलै रोजी बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या प्रोऍक्टिव्ह अबॅकस च्या नॅशनल समर कॉम्पिटिशन-२०२५ मध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.

अबॅकस चा नंबर वन ब्रँड असणाऱ्या प्रोऍक्टिव्ह अबॅकस ने १३ जुलै २०२५ रोजी बीड या ठिकाणी नॅशनल समर कॉम्पिटिशन चे आयोजन करण्यात आले होते. या समोर कॉम्पिटिशनमध्ये धाराशिव, अहिल्यानगर, नांदेड, लातूर व बीड या ठिकाणचे विद्यार्थी या कॉम्पिटिशनमध्ये सहभागी झाले होते. यात किल्ले धारूर येथील आरुष प्रोडक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यामध्ये २७ विद्यार्थी प्रथम द्वितीय व तृतीय रँक मध्ये आहेत तर ३१ विद्यार्थी हे चौथ्या ते सातव्या रँक मध्ये आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्रोऍक्टिव्ह अबॅकस ने ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले आहे.

प्रोऍक्टिव्ह अबॅकस चा बेस्ट सेंटर अवार्ड ही धारूर येथील आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस ला मिळाला आहे. यात दहा हजार रुपयांचा धनादेश देऊन आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकसचे संचालक प्रा.अविनाश जगताप व संचालिका शितल जगताप यांना सन्मानित केले आहे. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे संचालक अविनाश जगताप सर, संचालिका शितल जगताप मॅडम यांच्यासह पालकांतून व शैक्षणिक स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### तेजस्विनी ग्रुप आयोजित पंचमी आणि राखीपौर्णिमा स्पेशल

# महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री एक्झिबिशनला उपस्थित राहा : सोनल पाटील

बीड । प्रतिनिधी



तेजस्विनी ग्रुप आयोजित खास पंचमी आणी राखीपौर्णिमा निमित्ताने महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री एक्झिबिशनला सहकुटुंब भेट द्या व खरेदी करुन छोट्या व्यवसायिकांना प्रोत्साहन द्या असे आव्हान तेजस्विनी ग्रुप अध्यक्ष सोनल पाटील यांनी केले आहे.

तेजस्विनी ग्रुप आयोजित खास पंचमी आणी राखीपौर्णिमा निमित्ताने महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री ज्यामध्ये बाहेर गावाहून जसे की संभाजीनगर, पुणे, जालना, लातूर, उस्मानाबाद, अंबाजोगाई, परळी, धुळे, शहादा अशा विविध ठिकाणाहून वेगवेगळे स्टॉल, तसे खवैय्या साठी खाण्याचे सुद्धा विविध चवदार व अप्रतिम आयटम, कपडे, हेअर ऑईल, देवांची वस्त्रे, सोप्स, साड्या, मनमोहक पैठणी, कुर्तीज दोहोड, लेडीज वेअर्स, स्टोल, ओढणी, बांगड्या, मोत्याचे साहित्य, फ्रॉक्स, चॉकलेट्स, सर्व प्रकारच्या पर्सेस, स्वेटर्स, शुद्ध तुप, आगरबत्ती, पंचगव्य, नैसर्गिक हळद, तिखटी, लोणचे, सर्व प्रकारच्या चटण्या, खाद्य पदार्थ, ज्वेलरी, टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, सौंदर्य प्रसाधने, सर्व प्रकारचा, प्रोडक्ट, बॅटरी संवर्धन सोलार उर्जा प्रोडक्ट ई. व खुप काही असे आयोजन कॅनॉल रोड, रामकृष्ण लॉन्स येथे शनिवार आणी रविवार दिनांक १९ आणी २० जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत केले आहे तरी एक्झिबिशनला सहकुटुंब भेट द्या व खरेदी करुन छोट्या व्यवसायिकांना प्रोत्साहन द्या असे आव्हान तेजस्विनी ग्रुप अध्यक्ष सोनल पाटील यांनी केले आहे.



# श्रीमती मुन्नवर सुलताना शिक्षण विस्तार अधिकारी माजलगाव यांच्या सेवापूर्ती सोहळा

बीड । प्रतिनिधी

श्रीमती मुन्नवर सुलताना शिक्षण विस्तार अधिकारी माजलगाव यांच्या सेवापूर्ती सोहळा आज दिनांक १३/७/२०२५ रोजी बीड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार सय्यद सलीम हे होते सेवापूर्ती सोहळात विविध पक्षातील नेते व डॉक्टर्स शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वक्फ बोर्डाचे चेअरमन काजी समीर, समाजसेवक मुसाखान पठाण, एडवोकेट शफिक भाऊ, फारुख पटेल, मुसा सर, शेख इक्बाल मेंबर व आलेले सर्व प्रमुख पाहुण्यांनी सेवापूर्ती सोहळात आप आपल्या भाषणात श्री मुन्न वर सुलताना यांनी ४० वर्ष सेवा केल्याबद्दल सर्वांनी कौतुक केले व सर्व प्रमुख पाहुण्यांनी सेवापूर्ती सोहळात श्री मुन्नवर सुलताना यांचा सर्वांनी जाहीर सत्कार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काझी मुशाहेत सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मोहम्मद उबेद यांनी केले.

# पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया आश्रमात शालेय साहित्य व खाऊ वाटप : गणेश लांडे

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री आणि लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. या सेवाभावी उपक्रमांतर्गत पाली (तालुका बीड) येथील इन्फंट इंडिया अनाथ मुलांच्या आश्रमात शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन बऱ्हाणपूर गावाचे उपसरपंच गणेश लांडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. त्यांनी सामाजिक बांधिलकीतून प्रेरणा घेत पंकजाताई मुंडे यांच्या सेवा-कार्यपद्धतीचा आदर्श ठेवत हा कार्यक्रम पार पाडला.



या वेळी सुखदेव शिंदे, सिद्धेश्वर क्षीरसागर, अशोक माने, शिवा माने, पंडित लांडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आश्रमातील मुलांनी आनंदाने साहित्य व खाऊ स्वीकारले.

गणेश लांडे म्हणाले, सेवा हीच खरी शुभेच्छा या भावनेतून पंकजाताईंच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आम्ही हा उपक्रम राबवला आहे. गरजूंना आनंद देणं हाच खरा सन्मान आहे.



# राज्य पंच परीक्षेत ज्ञानदीप विद्यालयाचे निरडे सर उत्तीर्ण

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्य पंच परीक्षा दि.२९ जून २०२५ रोजी बीड येथे पार पडली. या परीक्षेत बीड केंद्रावरून एकूण ३९ परीक्षार्थींनी सहभाग घेतला होता. या परीक्षेत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. निरडे मुंजाराम भगवान यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्य पंच म्हणून पात्रता मिळवली आहे.

या निवडीमुळे निरडे सरांना महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय खो-खो सामन्यांसाठी पंच म्हणून कार्य करण्याची संधी प्राप्त झाली असून, ही बाब विद्यालयासाठी अत्यंत गौरवाची आणि प्रेरणादायी आहे. यश ही प्रेरणेची वाट असते! शिस्त, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्रोत ठरणार आहे. त्यांच्या कार्यातून मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस अनंत शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेचे पुनर्गठन

पाचोड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत कार्यरत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेचे पुनर्गठन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्षेत्रातील प्राचार्य, महाविद्यालय, प्राध्यापक, विद्यार्थी इ. घटकांच्या समस्या, धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभाग आणि प्रशासकीय अडचणी सोडवण्यासाठी अशासकीय प्राचार्यांची स्वतंत्र संघटनेचे पुनर्गठन करण्यात यावे. या विचारांच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य फोरम कार्यान्वित करण्यासाठी संघटनेची बैठक विद्यापीठ नाट्यगृहात १७ जून, २०२५ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्राचार्य संघटनेचा पाया घालण्यासाठी प्रारंभिक निर्णय घेण्यात आला.



त्यानंतर दुसरी महत्त्वपूर्ण बैठक दिनांक २९ जून, २०२५ रोजी मिलिया महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत निवृत्त सदस्यांचा यथोचित सन्मान करुन दिवंगत सदस्य यांना श्रद्धांजली अर्पण करुन रिक्त कार्यकारिणी सदस्यांच्या जागी नवीन सदस्य नियुक्त करण्याचा ठराव संमत करण्यात आला. तसेच, जिल्हानिहाय रिक्त पदांवर त्या-त्या जिल्ह्यांतील प्राचार्यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

वरील ठरावाच्या अनुषंगाने १३ जुलै, २०२५ रोजी शिवाजी महाविद्यालय, पाचोड येथे संघटनेची तिसरी बैठक पार पडली. यामध्ये जिल्हानिहाय नवीन पदाधिकारी आणि सदस्यांची निवड करण्यात आली. या बैठकीत खालीलप्रमाणे कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आले. अध्यक्ष - डॉ. विजय भोसले, प्राचार्य, शिवाजी विद्यालय, कन्नड, उपाध्यक्ष - डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य, आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा, सचिव - डॉ. सोपान निंबोरे-प्राचार्य, ड.बी डी हंबर्डे महाविद्यालय, आष्टी, सहसचिव-डॉ हरिदास फेरे, प्राचार्य, वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी, कोषाध्यक्ष-डॉ भारत खंदारे, प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय परतूर, जिल्हा निहाय नवनियुक्त कार्यकारणी सदस्य, धाराशिव - डॉ. प्रशांत चौधरी, बीड - डॉ. शिवदास शिरसाठ, अंबाजोगाई, डॉ. मोहम्मद ईलीयास, जालना - डॉ. रामेश्वर पवार, अंबड डॉ. सुनंदा तिडके. छत्रपती संभाजीनगर - डॉ. चंद्रसेन कोठावळे, डॉ. अशोक पंडित, डॉ. मजहर फारुकी आदींची निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतरच्या बैठकीत पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. १) जिल्हानिहाय संघटना नव्याने बांधणे २) नवीन प्राचार्यांना नेतृत्वाची संधी देणे. ३ ) विद्यार्थ्यांच्या अडचणी, शैक्षणिक वातावरण आणि दैनंदिन प्रशासनातील समस्या यावर विद्यापीठासी समन्वय साधून योग्य निर्णय घेणे. ४) मा.कुलगुरू डॉ. विजय फुलारी सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन शैक्षणिक विकासासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे. आदी निर्णय घेण्यात आले. निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांनी सर्व प्राचार्यांचे आभार मानत. संघटनेच्या माध्यमातून प्राचार्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असून, कार्यकक्ष विस्तारण्यावर भर दिला जाईल, असे ते म्हटले.



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सम्राट अशोक नगर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी संग्राम गायकवाड

माजलगाव । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने रविवार दिनांक १३ जुलै रोजी शहरातील सम्राट अशोक नगर येथे प्राथमिक आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा अध्यक्ष विजयदादा साळवे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून मार्गदर्शक म्हणून युवा नेते अमोल भैय्या शेरकर, विवेक जाधव, सन्नी प्रधान यांची उपस्थिती होती.

प्रसंगी या बैठकीत जयंती समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जयंती समितीच्या अध्यक्षपदी संग्राम गायकवाड, उपाध्यक्षपदी गणेश गायकवाड, कोषाध्यक्षपदी विजय वैराळ तर सचिवपदी विशाल पायके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असता यंदाच्या जयंती सोहळ्यात माजलगाव शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असून महापुरूषांच्या गायनाचा कार्यक्रम व व्याख्यानासह इतरही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे कमिटीच्या वतीने कळवण्यात आले आहे. प्रसंगी विराज आठवे, अजय साळवे, सुमित मोरे, आदेश शिरसागर, सिद्धांत सुरवसे, अभिषेक चौरे यांच्या सह सम्राट अशोक नगरातील जेष्ठ नागरिक तथा युवकांची उपस्थिती होती.

### कास्ट्राईबची जिल्हास्तरीय सहविचार सभा संपन्न

# कास्ट्राईब कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्काचं संघटन : सोनवणे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय सहविचार सभा डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे उत्साहात संपन्न झाली. या सभेमध्ये विविध विभागातील कास्ट्राईब कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



सभेच्या अध्यक्षस्थानी माजलगाव महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश गावडे यांनी तर प्रस्ताविक भारत टाकणखार यांनी केले. यावेळी महासंघाचे ज्येष्ठ नेते सूर्यकांत जोगदंड, लातूर विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे, माजी जिल्हाध्यक्ष रमेश माटे, दिनकर जोगदंड, जिल्हाध्यक्ष केशव आठवले, सुमेध जोगदंड, डॉ. संतोष बोबडे, बप्पाजी कदम, बा.म.पवार, संतोष दाणी, यशवंत सर, राजकुमार सोनवणे तसेच विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सहविचार सभेत कास्ट्राईब कर्मचार्यांच्या सेवाशर्ती, पदोन्नतीतील अडचणी, सामाजिक न्याय व कल्याण विभागाच्या योजनांचा लाभ, आधार कार्ड आधारित संच मान्यता रद्द करणे, जुनी पेन्शन आदी तसेच संघटनेच्या भविष्यातील दिशा व मुजोर प्रशासकीय अधिकाऱ्यांची कार्ययोजना यावर सखोल चर्चा करण्यात आली. कर्मचारी वर्गास भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडून त्यावर उपाययोजनांचा ठोस आराखडा ठरविण्यात आला.

सभेच्या शेवटी एकमताने ठराव संमत करण्यात आला की, कास्ट्राईब कर्मचार्यांच्या हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल व शासन दरबारी संघटनेचा आवाज ठामपणे मांडला जाईल. सहविचार सभेचा समारोप करताना मा.सूर्यकांत जोगदंड व बालासाहेब सोनवणे या दोघांनीही एकमताने सांगितले की, कास्ट्राईब कर्मचाऱ्यांच्या न्यायहक्कासाठी संघटना कटिबद्ध असून, प्रशासनासमोर ठोस भूमिका घेण्यासाठी सर्वांनी एकत्र राहणे अत्यावश्यक आहे.

या सहविचार सभेमध्ये चि. रोहित पुष्पा राजकुमार सोनवणे यांची एम पी एस सी ग्रुप सी मंत्रालयीन क्लार्क अंतर्गत डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस या ठिकाणी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रमेश डोंगरे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाखंडाची पुस्तके भेट दिल्याने त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन प्रतीक स्वामी यांनी केले. सहविचार सभेस राहुल पोटभरे, विलास जोगदंड, नितीन महुवाले, गौतम जोगदंड, सोनेराव लगस्कर, दीपक गायकवाड, एम.एस. गायकवाड, प्रा. आचार्य सर, मस्के सर, यशवंत कदम, अनिल शिंदे, नितीन धिवार, मनोज वाघमारे आदी उपस्थित होते तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी हनुमंत पांढरपोटे, वसंत टाकणखार, नारायण भाळशंकर, प्रवीण जाधव, राजेंद्र सातपुते, आजीमोद्दीन खतीब, रवी आदमाने, गवळी सर यांनी परिश्रम घेतले.



# मानवी हक्क अभियानच्या महिला तालुकाध्यक्षपदी सागरबाई दता इचके यांची निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी येथील सर्वसामान्य कुटुंबातील महिला ज्यांनी आपल्या सामाजिक कार्याने तालुक्यात आपले नाव केलेले असून मानवी हक्क अभियान या संघटनेच्या माध्यमातून गोरगरिबांच्या कमला प्राधान्य देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपणारी महिला सागरबाई दत्ता इचके यांच्या कामाची दखल घेऊन व जिल्हापरिषद पंचायत समिती निवडणूक डोळ्यासमोर ठेवून संघटनेची मोर्चेबांधणी सुरू केली असून संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद आव्हाड यांनी वडवणी महिला तालुकाध्यक्ष पदी सागरबाई दता इचकै यांची निवड केली जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले सर्व तालुक्यातून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# उघड्या डीपी बॉक्स ठरताहेत धोकादायक; नागरिकांचा जीव धोक्यात

## अनेक भागात उघड्या डीपी बॉक्समुळे अपघाताचा धोका निर्माण

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील मध्यवस्तीत असलेले शास्त्री चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील मुख्य रोडवरच उघड्या डीपी बॉक्स असल्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुला मुलींना व नागरिकांना तसेच मुख्या जनावरांना याचा धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे अनेक भागात उघड्या डीपी बॉक्समुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महावितरण त्यांच्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे.अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. परिसरातील धोकादायक स्थितील डीपींची त्वरित दुरस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

सविस्तर वृत्त असे की भर रस्त्यात उघडी डीपी लहान मुले नागरिकांना धोका मोका जनावरांनाही धोका महावितरणाचा गलथान कारभार शहरातील मुख्य मार्केट असलेले शास्त्री चौक मध्ये जाणारा रोडला उघड्यावरच डीपी आहे या डीपी मुळे शाळेत जाणाऱ्या मुले जाणारी नागरिक यांना धोका होऊ शकतो परंतु महावितरणाने आतापर्यंत या डीपीला दरवाजे का बसवले नाहीत? असा सवाल नागरिकात उपस्थित होत आहे एखाद्याच्या जीवाला काही धोका झाल्यावर महावितरण जागे होईल काय? अशी चर्चाही होत असल्याचे पाहायला मिळाले शहरातील जुन्या बस स्थानकाकडे जाण्याचा जो रस्ता आहे रस्त्याच्या कडेलाच उघडी डीपी आहे या डीपीला चिटकून रस्ता आहे या रस्त्याने दिवसभर लहान मुले महिला नागरिक यांची ये – जा असते भर रस्त्यामधील एवढ्या डीपी मुळे नागरिकांना धोका निर्माण झाला आहे तरी काही अघटीत होण्या अगोदर महावितरण मी डीपीला दरवाजे बसावेत अशी मागणी नागरिक करत आहेत बौद्ध विहारा जवळील रोडवर सुद्धा उघड्यावर डीपी आहे हे सुद्धा नागरिकांना धोक्याचे आहे या डीपीचे ही दरवाजे बसून महावितरण पुढील धोका टाळावा अशी नागरिक मागणी करत आहेत.



## खा. निलेश लंके यांच्या हस्ते लेखक दिग्दर्शक अल्ताफ शेख सन्मानित

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याचे जावई, सोलापूरचे भूमिपुत्र आणि पुणे येथे स्थायिक झालेले कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांना खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार वितरण सोहळा मातृभूमी सोशल फाउंडेशन, झेप फाउंडेशन, कांताभाऊ राठोड आणि अशोक पाटील यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यात सामाजिक, शिक्षण आणि कला क्षेत्रात काम करणाऱ्या विशेष व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाचे आजीवन सदस्य, सांगोला विधानसभा मतदारसंघाचे ११ वेळा सदस्य आणि राज्याच्या मंत्रिमंडळात दोन वेळा मंत्री राहिलेले गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे उत्कृष्ट लेखन आणि दिग्दर्शन केलेले अल्ताफ दादासाहेब शेख यांना याच चित्रपटासाठी खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुणे चे उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पोलीस उपायुक्त तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र राहुल आवारे, सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे, कामगार अधिकारी साळुंखे, उपविभागीय अभियंता मोहन भदाणे, पोलीस निरीक्षक शरद झिंने यांच्यासह अन्य मान्यवरांची कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके यांनी कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे कौतुक केले. लेखक, दिग्दर्शक अल्ताफ शेख यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी दिवंगत गणपतराव देशमुख कसे होते आणि त्यांच्यासोबत कामाचा अनुभव सांगून गणपतराव देशमुख अर्थातच आबासाहेबांसारख्या सत्कर्मी व्यक्तिमत्त्वावर बायोपिक रूपात चित्रपट तयार करणे हे खरे म्हणजे आजच्या व्यावसायिक युगात मोठ्या धाडसाचे काम आहे. हे धाडसाचे काम लेखक, दिग्दर्शक अल्ताफ शेख यांनी केले याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे असेही खासदार लंके म्हणाले.

### सिरसाळा ते तपोवण गट नं.४१३ व ४१४ मधला पांदन रस्ता मोकळा करून द्या; कुंडलीक लहाणे यांची मागणी!

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू

सिरसाळा । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकार लहाने सिरसाळा – तपोवन दरम्यान च्या गट नंबर ४१३,४१४ मधील पांदन रस्ता खुला करण्यात यावा अशी मागणी करत आहेत परंतु संबंधित प्रशासन मात्र या कडे लक्ष देत नाही, अखेर वैतागून पत्रकार कुंडलिक भागवत लहाने आपल्या कुटुंबासह बीड जिल्ह्याधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषणास बसले आहे.




सविस्तर माहीती अशी की, त्यांनी पुर्वी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, दोन वर्षात तहसिल कार्यालय परळी वै. जिल्हा कार्यालय बीड येथे अर्ज देण्यात आले होते अर्जाची कसलीही दखल प्रशासनाने घेतली नाही. २ सप्टेंबर २०२४ रोजी मुलाबाळा सह उपोषणाला बसणार होतोत पण परळी प्रशासनाने उपोषण करू नये असे सांगितले म्हणून त्या वेळी उपोषण केले नाही. परंतु संबंधित प्रशासनाने सिरसाळा – तपोवन पांदन रस्ता प्रश्न मार्गी लावला नाही. अखेर आज दि.१४ जुलै पासून बीड कार्यालय समोर उपोषण सुरू केले आहे. दि.४/९/२०२३ रोजी नागरिकांनी सिरसाळा ते तपोवन जाणाऱ्या पांदन रस्ता पूर्वी वाहतुकीस मोकळा करून देण्यात यावे अशी मागणी केली होती. ८/२/२०२३ रोजी मंडळ अधिकारी यांनी पंचनामा देखील केला पण पुढील कार्यवाही परळीचे तत्कालीन तहसीलदार यानी काहीच केले नाही. याबाबत म्हणून मी दि.२५/७/२०२३ रोजी व २ सप्टेंबर २०२४ रोजी उपोषण बसणार होतोत पण प्रशासन म्हाणले कि, प्रश्न मार्गी लावतोत म्हणून उपोषण केले नाही व नंतर ७/२/२०२४ व २/६/२०२५ रोजी पुन्हा आर्ज दिला आहे पण या बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देखील काहीच उत्तर मिळाली नाही गट नंबर ४१३ व ४१४ मधील तपोवन ते सिरसाळा पूर्ण नाही तरी गट नंबर ४१३ च्या ११ गुंठे जमिनी पुरता तरी काढून देण्यात यावे ही विनंती लहाणे यांनी केली होती.

आज तीन वर्षापासून मी सिरसाळा ते तपोवन रस्त्यासाठी तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करतोय पण अर्जाची कसलीही दखल घेतली जात नाही परंतु महसूल विभाग प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे काही लोकांनी इथे पांदण रस्ता नाही म्हणत मला व माझ्या मुलाला मारहाण करण्यात आली पांदण रस्ता वेळेत मोकळा न केल्यामुळे कायदा व सुव्यवस्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेची टाकरवन शाखा पंधरा दिवसांपासून व्यवस्थापकाविना

टाकरवन । प्रतिनिधी

येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत मागील पंधरा दिवसापासून शाखा व्यवस्थापक नसल्याने खातेदारांचे अनेक कामे रखडले आहेत. त्यामुळे टाकरवन शाखेला तात्काळ शाखा व्यवस्थापक द्या अशी मागणी खातेदारातून केली जात आहे. माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा आहे. येथील शाखेत परिसरातील १५ ते २० खेड्यातील शेतकरी कामगार व्यवसायिक व्यापारी व बचत गटातील महिला असे हजारो खातेदार आहेत. पंधरा दिवसापुर्वी येथील शाखा व्यवस्थापकाची बदली झाली आहे. मात्र शाखेला नवीन शाखा व्यवस्थापक कोन आहेत? ते कधी बँकेत येथील याची वाट मागील पंधरा दिवसापासून खातेदार बघत आहेत. परिणामी पंधरा दिवसापासून शाखा व्यवस्थापका विनाच चालत असल्याने अनेक खातेदारांची वेगवेगळी कामे ठप्प झाले आहेत. त्यामुळे तात्काळ शाखा व्यवस्थापन द्या अशी मागणी खातेदारांमधून केली जात आहे. जिल्हा उद्योग केंद्रातुन सबसिडी खात्यावर वर्ग करण्यासाठी पत्र आलेला आहे. हे पत्र घेऊन मी काही दिवसापासून बँकेत जात आहे. मात्र हे काम शाखा व्यवस्थापकाचे आहे. शाखा व्यवस्थापक नाहीत असे सांगितले जात आहे.




मी बँकेत अनेक दिवसापासून खेटे मारत आहे. राज्यात बच्चू कडू यांचे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मोठे आंदोलन सुरू आहे. मुख्यमंत्र्यांनी समिती गठीत करू व पिक कर्जाची वसुली थांबवू आसे आश्वासन शेतकऱ्यांना दीले मात्र त्यानंतरही बँकांकडून शेतकऱ्यांचे खाते गोठवुन पिककर्जाची वसुली केली जात आहे. त्यामुळे शेतकरी व बँक अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद होत असल्याचे प्रसंग दिसुन येत आहेत.

# कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले!

## दुबार पेरणीचे संकट असतानाही अहवालात पीक परिस्थिती छान; शेतकऱ्यांचा संताप : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील तीन आठवड्यांपासून पावसाने पूर्णतः पाठ फिरवली आहे. खरीप हंगामात पेरणी झालेली पिके धोक्यात आली असून, पावसाअभावी पिकांच्या उगवण क्षमतेवर गंभीर परिणाम झाला आहे. पिके माना टाकू लागली, तर काही ठिकाणी रोपे सुकून जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे.

मात्र अशा स्थितीतही जिल्हा कृषी विभागाने ९ जुलैच्या अहवालात जिल्ह्यातील खरीप पिकांची परिस्थिती चांगली असल्याचे नमूद केले आहे. यावरून संतापलेल्या शेतकऱ्यांनी थेट सवाल केला. कृषी विभागाचे डोके ठिकाणावर आहे काय? हा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.



**जिल्ह्यातील खरी परिस्थिती**

९ जुलै अखेर जिल्ह्यात ६,८१,३९८ हेक्टरवर पेरणी (८४.२३%) पूर्ण. १ जून ते ९ जुलै दरम्यान सरासरी १९४.१ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ १४०.८ मिमी पाऊस. सर्वात कमी पाऊस धारूर तालुका (४६.१ मिमी) आणि सर्वात जास्त पाऊस वडवणी तालुका (१२९ मिमी).

पावसाने उघडीप दिल्यामुळे पिके सुकण्याचा धोका वाढला आहे. वातावरण ढगाळ असले तरी वरून पाऊस बरसत नाही. शेतकरी हवालदिल झाले आहेत.

**शेतकऱ्यांचा तीव्र रोष**

वातानुकूलित कार्यालयात बसून 'पीक परिस्थिती चांगली' असा अहवाल देऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जाते.

**– मोहनराव कोटुळे, शेतकरी लिंबागणेश**

लिंबागणेश येथील मोहनराव कोटुळे, दामोधर थोरात, श्रीहरी निर्मळ, चंद्रकांत आवसरे, रमेश गायकवाड, रामचंद्र मुळे, प्रमोद निर्मळ या शेतकऱ्यांनीही कृषी विभागावर रोष व्यक्त केला.

**रोग व पिकांचा धोका**

यंदा कापसाऐवजी सोयाबीन पेरणी अधिक झाली आहे. परंतु लांबलेल्या पावसामुळे पिकांची वाढ खुंटते आहे. पाने खाणाऱ्या अळींचा व अल्प प्रमाणात खोडमाशीचा प्रादुर्भाव असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे. मात्र यामुळे आर्थिक नुकसान नाही असा दावा करण्यात आला, जो शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारा ठरला आहे.

### राज्य सरकारच्या नवीन अटी व वाढलेल्या कराच्या धोरणांविरोधात बार, रेस्टॉरंट आणि वाईन शॉप मालक संघटना आक्रमक

# धारूर शहरातील दारूची दुकाने आणि बार पूर्णपणे बंद

धारूर । प्रतिनिधी

दि१४ जुलै सोमवार रोजी धारूर शहरातील सर्व दारूची दुकाने आणि बार/परमिट रुम्स पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते.राज्यभरातील हॉटेल–रेस्टॉरंट आणि वाईन शॉप मालक संघटनांनी राज्य सरकारच्या नवीन अटी व वाढलेल्या करांना विरोध दर्शवण्यासाठी 'बार बंद' किंवा 'नो अल्कोहोल डे' चे आयोजन केले आहे. या देशव्यापी बंदमध्ये धारूर शहरही सामील झाले असून, शहरातील सर्व संबंधित प्रतिष्ठाने आज दिवसभर बंद राहणार आहेत. या बंदमागे राज्य सरकारने लागू केलेली काही प्रमुख धोरणे कारणीभूत आहेत, ज्यामुळे व्यवसायांवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




प्रमुख मागण्या आणि वाढीव दर खालीलप्रमाणे आहेत. व्हॅट (त–ढ) वाढ: विक्रीकरात (व्हॅट) ५% वरून १०% पर्यंत वाढ करण्यात आली आहे. यामुळे दारू विक्रीतून मिळणारा नफा कमी होऊन ग्राहकांवरील भार वाढण्याची शक्यता आहे. वार्षिक परवानगी शुल्कात वाढ : हॉटेल, रेस्टॉरंट आणि दारू दुकानांसाठी लागणाऱ्या वार्षिक परवानगी शुल्कात तब्बल १५% वाढ करण्यात आली आहे. यामुळे परवाना नूतनीकरणाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. औष्णिक दारू उत्पादन शुल्कात वाढ: बीअर आणि इतर कमी अल्कोहोल असलेल्या पेयांवरील उत्पादन शुल्कात ६०% नी प्रचंड वाढ करण्यात आली आहे. यामुळे उत्पादन खर्च वाढून त्याचा थेट परिणाम विक्री दरांवर होणार आहे. या वाढीव कर आणि शुल्कामुळे बार, रेस्टॉरंट आणि दारू दुकानदारांचे व्यवसाय मोडीत निघण्याच्या मार्गावर असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या हजारो लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारच्या या धोरणांमुळे छोटे व्यापारी आणि उद्योजक मोठ्या आर्थिक संकटात सापडण्याची भीती व्यक्त करत आहेत. राज्य सरकारने तातडीने या मागण्यांचा विचार करून वाढवलेले दर मागे घ्यावेत, अशी मागणी धारूर येथील दारू व्यावसायिक आणि हॉटेल मालकांनी केली आहे. जर सरकारने यावर योग्य तोडगा काढला नाही, तर भविष्यात आंदोलन आणखी तीव्र करण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. आजच्या बंदमुळे शहरभरात मद्यप्रेमींना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

# रुपालीची सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## १० जणांविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, दोघे अटक

सिरसाळा । प्रतिनिधी

दि.१३.७.२०२५ रोजी सासरच्या मानसिक, आर्थिक, शारिरीक जाचास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना परळी तालुक्यातील डिग्रस येथे घडली आहे. रूपाली श्रीनिवास नाटकर वय ३३ वर्षे असे मयत विवाहितचे नाव आहे. हि घटना १२ जुलै रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारासरा राहात्या घरात घडली आहे. याप्रकरणी मयताचे वडील दिगंबर श्रीराम कदम वय ५२ वर्षे रा. देऊळगाव गाथा तालुका सेलू जिल्हा परभणी यांच्या फिर्यादीवरून शिरसाळा पोलीस स्टेशन येथे आरोपी सासरे, सासू, नवरा, ननंद व घरातील इतर मंडळी नामे १) श्रीनिवास बालासाहेब नाटकर, २) बालासाहेब कुंडलिकराव नाटकर, २) शामल बालासाहेब नाटकर, ३) सुरमा भागवत नाटकर, ४) शुभांगी, मोनिका, सोनाली, वसंत कुंडलिकराव नाटकर, संगीता वसंत नाटकर सर्व रा. दिग्रस तालुका परळी जिल्हा बीड यांच्याविरुद्ध कलम यांच्याविरुद्ध कलम ८५, १०८, ११५, ३५२, ३५१ (२) ३ (५) बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी सांसरे वसंत कुंडलिकराव नाटकर, भागवत बालासाहेब नाटकर रा.डिग्रस यांना अटक करण्यात आली आहे. फिर्यादीत असे म्हटले आहे की, घर खरेदी करता पंधरा लाख रुपयाची मागणी करून फिर्यादीचे मुलीचा शारीरिक मानसिक छळ करून तिची आत्महत्या करण्यास प्रवर्त केले आहे. असल्यामुळे फिर्यादीच्या मुलीने म्हणजे रूपाली हे मेथीचे राहते घरी मौजे दिग्रस येथे अंगावर ज्वलनशील पदार्थ घेऊन पेटवून घेऊन आत्महत्या केली. तिचे मृत्यू वरील आरोपी कारणीभूत झाले आहेत. म्हणून काम नमक प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आदिक तपाससह पोलीस निरक्षक गोरखनाथ दहिफळे करत आहेत. रूपाली चा अंत्यविधी दिग्रस गावातच झाला.



मयत रूपालीचे अंबाजोगाई शासकीय रुग्णालयात शौउच्चधन नंतर तिचे झाल्या माहेरी देवळगाव गाता येते न घेऊन जाता सासरी दिग्रस येथेच अंत्यविधी करण्यात आला. रूपालीचा अंत्यविधी केवळ माहेरी लोकांनी/ नातेवाईकांनी केला. सासर मंडळीतील नातेवाईक अथवा डिग्रस गावातील नागरिक अंत्यविधीस उपस्थित नव्हते. सगळे गाव भयान शांत होते. अंत्यविधी दरम्यान पोलीस प्रशासन उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

# सियासत का सितारा, जनसेवा का उजाला, जनता के दिलों पर राज करता है धनंजय मुंडे का प्याला!

## महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व ना. धनंजय मुंडे



वाढदिवस विशेष । दिपक थोरात

अत्यंत साध्या आणि ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेले धनंजय मुंडे यांनी अल्पावधीतच राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांची सुरुवात राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक अध्यक्ष म्हणून झाली, पण पुढे त्यांनी विधीमंडळात आपली नेतृत्वक्षमता दाखवत विरोधी पक्षनेते ते मंत्रीपदापर्यंतचा प्रवास यशस्वीरित्या पार केला.

सामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारा नेता, प्रशासनाकडून ठोस निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करणारा कार्यकर्ता आणि आपल्या मतदारसंघातील समस्या डोळ्यांसमोर ठेवून काम करणारा जनतेचा सेवक ही धनंजय मुंडे यांची खरी ओळख आहे.

मंत्रीपदाच्या काळात त्यांनी सामाजिक न्याय विभागात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. दिव्यांग, वृद्ध, आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी योजनांची अंमलबजावणी त्यांनी प्रभावीपणे केली. मराठवाड्यासारख्या भागात पाणी, रोजगार आणि शिक्षण या मुद्द्यांवर त्यांची भुमिका नेहमीच ठाम राहिली.

त्यांचा संवादकौशल्य, मुद्देसूद वक्तृत्व आणि कोणत्याही राजकीय दबावाला न जुमानता भूमिका मांडण्याची शैली ही त्यांना इतर नेत्यांपेक्षा वेगळी ओळख देते.

धनंजय मुंडे हे केवळ एक राजकीय नेता नाहीत, तर ते अनेक तरुणांचे प्रेरणास्थान आहेत. ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातून ते राज्याच्या कॅबिनेटमध्ये पोहचले, ही गोष्ट त्यांच्या जिद्द, मेहनत आणि स्पष्ट ध्येयधोरणाची साक्ष आहे. विरोधी पक्षनेते असो किंवा सामाजिक न्यायमंत्री, त्यांनी नेहमीच ठोस भूमिका घेतल्या. सामाजिक न्याय विभागात त्यांनी घेतलेले निर्णय हे वंचित, गरीब, मागास आणि उपेक्षित घटकांसाठी मैलाचा दगड ठरले. दिव्यांगांसाठी निधी वाटप, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, वसतिगृह उभारणी असे कितीतरी उपक्रम त्यांच्या कार्यकाळात सुरू झाले.

धनंजय मुंडे हे राजकारणात जितके आक्रमक आहेत, तितकेच ते लोकांच्या सुख–दुःखात सहभागी होणारे नेते आहेत. पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी विधानसभा, सभागृह आणि जनतेच्या व्यासपीठावर आपली भूमिका मांडली आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त लाखो समर्थक शुभेच्छा देत आहेत, हीच त्यांची खरी संपत्ती. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचे भविष्य उज्ज्वल राहील, असा विश्वास अनेकांना आहे.

राजकारणातील प्रगल्भ नेतृत्व, जनतेच्या दुःख–दुःखाशी नाळ जुळवणारा नेता, आणि तळागाळातील माणसांसाठी झटणारा कार्यकर्ता म्हणून धनंजय मुंडे यांची वेगळी ओळख आहे.

आज त्यांचा वाढदिवस... या खास दिवसानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेणे ही एक अभिमानाची गोष्ट आहे. धनंजय मुंडे हे केवळ एक राजकारणी नाहीत, तर ते जनतेच्या मनात घर करून राहिलेले जननेते आहेत. बीड जिल्ह्यासारख्या मागास भागातून येऊन राज्याचे मंत्रीपद भूषवणे हेच त्यांच्या कर्तृत्वाचे मोठे उदाहरण आहे. त्यांनी सामाजिक न्यायमंत्री म्हणून केलेले काम, तसेच ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, महिला, बेरोजगार वर्गासाठी राबवलेले उपक्रम उल्लेखनीय आहेत. ते जितके प्रभावी वक्ते आहेत, तितकेच संवेदनशील मनाचे देखील आहेत. एखाद्या गावात अडचण असो, पाणीटंचाई, शिक्षणाचा प्रश्न असो वा आरोग्यसेवा धनंजय मुंडे तात्काळ प्रतिसाद देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.

त्यांनी बीड जिल्ह्याच्या राजकारणाला नवे वळण दिले आहे. एकेकाळी केवळ पारंपरिक राजकारणात अडकलेला हा जिल्हा, मुंडे साहेबांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या नव्या प्रवाहात सामील झाला आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली रस्ते, पाणी, वीज, आरोग्य व शिक्षण यामध्ये उल्लेखनीय सुधारणा झाल्या.

हक्क मागायचा नसतो, तो छिनून घ्यावा लागतो हे त्यांचे ब्रीदवाक्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणा देणारे आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देणाऱ्या कार्यकर्त्यांची, चाहत्यांची व जनतेची मोठी गर्दी दिसते आहे. सोशल मीडियावरून, भिंतीवरच्या पोस्टरपासून ते रुग्णालयात होणाऱ्या आरोग्य शिबिरांपर्यंत सर्वत्र धनंजय मुंडे हे नाव गूंजत आहे.

धनंजय मुंडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.. जनतेच्या आशा–आकांक्षा पूर्ण करणाऱ्या या लढवय्या नेत्याचा मार्ग नेहमी उजळ राहो, हीच प्रार्थना!

